International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 6.457
Vol.6 No.6 July–Aug 2019

# ग्रामीण भागातील दलित-सवर्णांच्या जीवनवास्तवाचा वेध : तणकट (कादंबरी)

**Dr. Pawar Kisan Karnasaheb**
Associate Professor , Dept. Of Marathi
Uma Mahavidyalaya Pandharpur, Dist- Solapur, 413304(MS)

**प्रास्ताविक :-**

राजन गवस हे विसाव्या शतकातील शेवटीच्या दोन दशकातील एक महत्वाचे कादंबरीकार आहेत. राजन गवस यांनी कथा, कादंबरी आणि समीक्षा या तिन्ही प्रांतात स्वतःची अशी वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. राजन गवस यांनी 'तणकट' ही कादंबरी सन १९९८ साली लिहिलेली आहे. प्रामुख्याने ग्रामीण जीवनावर कादंबरी लेखन करणारे कादंबरीकार म्हणून राजन गवस यांचा नावलौकिक आहे. त्यांच्या 'चौंडक' (१९८५), 'भंडारभोग' (१९८९), 'धिंगाणा' (१९९२), 'कळप' (१९९७) आणि 'तणकट' (१९९८) या कादंबऱ्यांनी मराठी साहित्यात आपली स्वतंत्र नाममुद्रा उमटविलेली आहे. त्यांच्या 'तणकट' या कादंबरीला सन २००१ सालचा साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभलेला आहे.

**आशयसूत्र व कथानक :-**

राजन गवस यांच्या सामाजिक जगण्याचा आत्मविष्कार घेऊन साकारलेली 'तणकट' ही कादंबरी समकालीन ग्रामीण भागातील दलित सवर्णांच्या जीवनवास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न करते. मराठी साहित्यात अशाप्रकारचा प्रयत्न अभावानेच झालेला आहे. या पार्श्वभूमीवर राजन गवस यांची 'तणकट' ही कादंबरी उल्लेखनीय आहे. राजन गवस यांनी 'तणकट' ही कादंबरी 'शाहू महाराज आणि दया पवार नावाच्या आठवणीस' अर्पण केलेली आहे. ही अर्पणपत्रिका खूप अन्वर्थक आहे. प्राचार्य डॉ. महेंद्र कदम हे 'तणकट' या कादंबरीबाबत आपले मत मांडताना म्हणतात, "राजन गवस यांनी 'तणकट' मध्ये बदलत्या ग्रामव्यवस्थेचा वास्तवपूर्ण उभा-आडवा छेद घेतलेला आहे. तरीही गावगाड्यातील इतर बलुतेदारांची मानसिकता, मराठ्यांची भाऊबंदकी, गावातील राजकारण, निसर्गाचा एकूण गावगाड्यावर होणारा परिणाम यांचे तपशील कादंबरीत आले असते तर तिची परिणामकारकता अधिक प्रभावी ठरली असती. तरीही बदलत्या ग्रामव्यवस्थेचे चित्रण करता करता वर्तमानाची प्रतिष्ठापना करत 'तणकट' ने दलित,

ग्रामीण, प्रादेशिक, नागरी कादंबरीच्या भेदरेषा पुसून टाकल्या आहेत. 'तणकट' चे हे यश ठळकपणे नजरेसमोर येणारे आहे..."१ 'तणकट' कादंबरीच्या एकूणच रचनाबंधाबद्दल महेंद्र कदम यांनी मांडलेले मत अत्यंत महत्वपूर्ण आहे. राजन गवस यांनी अत्यंत तटस्थपणे खेड्यातील दलित समजाचे वर्तमान वास्तव मांडलेले आहे. 'तणकट' ही कादंबरी कबीर कांबळे व त्याचा म्हारवाडा आणि गाव यांची कथा आहे.

दलितांच्या वस्तीचे बदलते स्वरूप, तेथे अस्तित्त्वात असणाऱ्या सत्तेच्या व्यवस्था, ग्रामव्यवस्थेतील सरपंच, महार, मांग, मराठा, लोहार, परीट, न्हावी, कडूचे लेकावळे अशी जात आणि व्यवसायामध्ये विभागलेली समाजव्यवस्था तसेच या दोन केंद्रांच्या मध्यवर्ती असणारी कबीर कांबळे आणि बाळासाहेब शेडबाळे ही दोन माणसे, त्यांच्या भोवतीची तरणी पोरं, म्हातारी-कोतारी माणसे या सर्वांचे मिळून एक जीवननाट्य लेखकाने 'तणकट' मध्ये उभे केलेले आहे. आजच्या लहान गावामध्ये असलेले गोंधळाचे वातावरण, नेत्यांचे डावपेच, भ्रष्ट आणि कुटील आचरण, विसाव्या शतकाची अखेर येऊनही समाजात अद्यापही खोलवर रुजलेली सर्व पातळयांवरची जातीव्यवस्था या साऱ्यांचे नेमके आणि वास्तववादी भान देणारी ही कादंबरी आहे. 'तणकट' चे अवकाश दूध डेअरीतील भ्रष्टाचार, असहाय्य गरिबांची फसवणूक, महार-मांगातले तंटे, जाहीर मेळावे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीचा गजर, भाषणबाजी करणारा वर्ग व त्यांची टगेगिरी आणि एकमेकांच्या जीवावर अन् घरावर उलटण्याच्या प्रवृत्तींनी व्यापलेले आहे.

कबीर सदोबा कांबळे हा दलित समाजात विशेषतः महार जातीत जन्मलेला नायक खूपच संवेदनशील, भावनांची कदर करणारा आणि सामाजिक समतेवर श्रद्धा असणारा नायक आहे. कबीर हा दलित समाजातील चळवळींपासून आणि चळवळीतल्या भ्रष्ट लोकांपासून स्वतःला नेहमीच अलिप्त ठेवत असतो. ग्रामीण जीवनातील दलित समाजाचे शोषण बाळासाहेब शेडबाळे सारखा माणूस करतो. बाळासाहेब शेडबाळेने या समाजातील माणसांची आर्थिक फसवणूक केल्यानंतर त्यांचे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी कबीर स्वतः धडपड करतो. आपल्या समाजातील लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी तो आपल्याच गावातील आक्काबा राणेसारख्या अनुभवी व प्रतिष्ठित लोकांची सतत मदत घेत राहतो. दलित समाजाचे मूळ प्रश्न समजून न घेणाऱ्या आणि दलित समाजातील वास्तवाला दूर नेणाऱ्या दलित चळवळीतील कार्यकर्त्यांपासून दूर राहतो.

बदलत्या सामाजिक परिवर्तनामुळे गावा-गावांमध्ये दूध डेअरी, पतसंस्था निघाल्या. दुध डेअरीमध्ये काम करता करता बँकेत नोकरी करणारा बाळासाहेब शेडबाळे हा साठ हजार रुपयांचा भ्रष्टाचार करतो आणि डेअरीचे चेअरमन बंडू पाटील व सेक्रेटरी तुळसीदास मिसाळला अडचणीत आणतो. त्यामुळे गावातील सर्वच लोक त्याला वाळीत टाकतात. त्यामुळे स्वतःला भक्कम बनविण्यासाठी बाळासाहेब शेडबाळे सर्व महार पोरांना एकत्र करुन त्यांची संघटना बांधतो आणि गावाविरुद्ध त्यांना उभे करतो. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाचे आजच्या दलितांनी विकृतीकरण केले आहे, याचे दर्शन घडते. संघटित होऊन सवर्णांना धडा शिकविण्यासाठी एकत्र आलेले दलित तरुण वेगवेगळया संघटना बांधण्यात, वर्तमानपत्रात प्रसिद्धी मिळविण्यात आणि स्वतःच्या तुंबड्या भरण्यात मशगुल झालेले आहेत. या संघटनांमध्ये सत्ताकारण घुसल्यामुळे 'संघटित व्हा' हा त्यांचा मूळ

हेतूच बाजुला गेलेला आहे. त्यामुळे दादू महार, गौत्या, पंढऱ्या, डेप्युटी गोपाळ अशासारखे दलित एकत्र येऊन स्वतःच्या विकासाऐवजी गावाला वेठीस धरतात. त्यामुळे त्यांचा विकास होण्याऐवजी अधोगतीच झालेली आहे. याबाबत कादंबरीतील थळू आजा (तराळ) मार्फत लेखकांनी चिंतन मांडलेले आहे, "लेकरा, असं न्हाई. एकदम तोडून न्हाई जमत गावाला, किती केलं तरी पांढरीतलीच हायती ती बी. काळीज एकच हाय. त्यास्नीबी न्हाई दुकवायचं. हाळूहाळू गावात बी फरोक झालाय. तुज्यासारक्या पोराला मांडीला मांडी लावून घेत्यात. पोरा, नशीबवान हाईसा. आम्हाला बेलट्याशिवाय थारा नव्हता. आता त्ये गेलं का न्हाई? तसं जाईल सगळं हाळू हाळू. बाबासाबाची पुण्याई दुसरं काय! "(पृ.६९) संपुर्ण गावगाडा बघितलेल्या आणि परस्परांचे नीट आकलन असलेल्या थळू आज्याचे हे उद्गार म्हणजे गाव आणि म्हारवाडा यांच्यातील दरी संपुष्टात येत असल्याचे निदर्शक आहे.

गाव, गावकुसाबाहेरील जीवन यातील ताण-तणाव, क्रिया प्रतिक्रिया, साद-पडसाद यांनी साकारलेली ही कादंबरी जीवनाच्या वास्तवतेला चित्रित करते. गाव गावकुसाबाहेरील समाज यांना अतिशय प्रत्ययकारीतेने व्यक्त केलेले आहे. राजन गवस यांनी मानवी वृत्ती प्रवृत्तींच्या वैविध्याचाही आढावा घेतला आहे. तसेच समाजातील जातीयतेवरही प्रकाश टाकला आहे. 'तणकट' कादंबरीतून साकारलेल्या वैविध्यपुर्णतेविषयी डॉ. किशोर सानप आपले मत मांडताना म्हणतात, 'तणकट' ही कळप पेक्षा अधिक घट्ट आणि सुबंद्ध अशी, घटनाप्रसंग आणि त्यामागच्या भूमिकांनी साकार झालेली समाजाचे समकालीन वास्तव मांडणारी कृती आहे...."[२] डॉ. किशोर सानप यांनी 'तणकट' ही कादंबरी समकालीन वास्तव आणि त्या समाजातील माणसाच्या असणा-या भूमिका अशी सामोरे आणते हे सांगितले आहे.

राजन गवस यांनी दलितांमधील उच्चभ्रू लोकांचाही खरपूस समाचार 'तणकट' मध्ये घेतलेला आहे. ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन नोकरीच्या निमित्ताने शहरांमध्ये राहणाऱ्या आणि गावातील आई-वडिलांना विसरणाऱ्या नोकरदार मध्यमवर्गियांच्या विक्षिप्त वागण्यावरही लेखकाने अचूकपणे बोट ठेवलेले आहे. यासंदर्भात तानू म्हातारीची प्रतिक्रिया अतिशय बोलक्या स्वरूपाची आहे. तानु म्हातारीचा एक मुलगा कोल्हापुरात पोलीस म्हणून नोकरीस होता. नोकरीच्या निमित्ताने तिचा मुलगा कोल्हापुरात स्थायिक झाल्यानंतर तो आपल्या म्हाताऱ्या आईवडीलांकडे अजिबात फिरकत देखील नाही, तेव्हा तानु म्हातारी मुलास पत्र लिहण्यास कबीरला सांगताना म्हणते, 'पयल्यांदा लीव, तुजं पत्र का न्हाई. आईला पत्र पाठवायला कटाळलास काय? आई मरावी आसं तुला वाटतय काय? तसं वाटत असलं तर तसं कळीव म्हणावं. कुठल्या तरी तळयात न्हाईतर कुणाच्या तरी भावीत जीव देती. म्हणजी तू मोकळा व्हशील. तुझ्या बायकोला आनंद व्हईल. दोघंजन राजा-राणीगत ऱ्हाशीला, गावाला याला तुला लाज वाटती. खरं, ह्या गावाचं तुकडं खावूनच न्हानाचा मोठा झाला हाईस. पांढरीला इसरलास तर तुझं चांगलं व्हनार न्हाई. शेवटी मेल्यावर तुला पुराय म्हारकीतच आणाय पायजे. एवढा एकदम मातू नगंस. चार पैसं आनी बायको झाली म्हणजी जय झालं न्हवं. राज्याला त्ये सुईची गरज लागतीया. आनी तुजं तरी काय? कदी तरी तुला तुझ्या वागण्याचा पचेताप व्हईल. तवा तुजी ही आई मातीत गेल्याली आसंल....' (पृ.२५,२६) मुलाने तिचा केलेला दुस्वास यामुळे तानू म्हातारीची झालेली ही तडफड प्रातिनिधिक स्वरुपात आलेली आहे.

'तणकट' कादंबरीच्या माध्यमातून राजन गवस यांनी दलित समाजाच्या उद्धारात दलित चळवळींना आलेले अपयश, दलित समाजाने आंधळेपणाने त्याला दिलेला पाठींबा आणि या सर्व बाबींकडे संवेदनशील व विवेकी दृष्टीने पाहणारे तरुण हे चळीवळींपासून आणि आपल्या समाजापासून कसे दूर चाललेले आहेत, या गोष्टींवर प्रकाशझोत टाकलेला आहे. कबीर, मोहन बल्लाळ, काशिनाथ, हिरामण इत्यादी मित्रांच्या संवादातून दलितांना आज पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा लेखकाने प्रयत्न केलेला आहे. कबीरने प्रत्यक्षात ठामपणे मांडलेले विचार व त्याच्या मनात चाललेले विचार यांच्या मांडणीमधून लेखकाने दलित-दलितेतर संघर्षाचा ढोबळपणा नाहीसा केलेला आहे. यासंदर्भात भारती निरगुडकर आपले मत मांडताना म्हणतात, "दलित साहित्यात ग्रामीण भागातील दलितांच्या समकालीन जीवनाचा सम्यक वेध घेण्याचा प्रयत्न अभावानेच झालेला दिसतो. या पार्श्वभूमीवर 'तणकट' मध्ये रूढ ग्रामीण व दलित समस्या एकेका प्रसंगाच्या रूपाने किंवा केवळ उल्लेखातून नोंदल्या जातात. कृषीसंस्कृतीच्या संदर्भात माणसामाणसांतील संबंध समंजसपणे टिकवले पाहिजेत व प्रश्नांची नवी मांडणी केली पाहिजे हे भान लेखकाने फार ताकदीने दिले आहे. समकालीन ग्रामीण जीवनावरील विधायक, मार्मिक भाष्य या दृष्टीने मराठी कादंबरीच्या क्षेत्रात 'तणकट'चे स्थान हे निश्चितच वरचे आहे."[३] हे भारती निरगुडकर यांचे मत संपुर्ण कादंबरीचे अवलोकन करता सत्य असल्याचे लक्षात येते.

**व्यक्तिरेखा**

राजन गवस यांची सन १९९८ साली प्रकाशित झालेली कादंबरी अत्यंत दर्जेदार आहे. लेखकाने अत्यंत अलिप्त व तटस्थपणे खेड्यातील गावगाडा, मांगवाडा, म्हारवाडा यांच्यातील संघर्ष विविध व्यक्तिरेखांच्या माध्यमातून साकार केलेला आहे. दलित आणि सवर्णांमधील खेड्यातील वास्तववादी संघर्ष ते वाचकासमोर उभा करतात. राजन गवस यांनी अनेक व्यक्तीरेखांद्वारे संपूर्ण गावाचा व्यापक पट मांडलेला आहे.

**कबीर कांबळे**

'तणकट' या कादंबरीतील 'कबीर कांबळे' ही व्यक्तिरेखा प्रमुख व्यक्तिरेखा आहे. तो शिकलेला, संवेनशील, संयमी आणि विवेकी तरुण आहे. तो 'तणकट' या कादंबरीचा नायक असून त्याचे समाजाबद्दलचे निरीक्षण अतिशय सूक्ष्म आहे. तणकट मधील सर्व घटनांचा तो साक्षीदार आहे. महार समाजात जन्मलेला कबीर हा संवेदनशील, भावनांची कदर करणारा आणि सामाजिक समतेवर श्रद्धा असणारा नायक आहे. त्याच्या मनात महारवाड्याविषयी प्रचंड आत्मियता आहे. विनाशाकडे चाललेला हा महारवाडा वाचविण्यासाठी तो तळमळीने धडपड करतो. महाविद्यालयीन शिक्षणाच्या निमित्ताने तो दररोज शहरात जातो. गावातील व शहरातील संघर्ष आणि बदल तो डोळसपणे पाहत असतो. दलित समाजाच्या कोणत्याही चळवळीत तो सामील होत नाही. चुकीच्या मार्गाने जाणाऱ्या समाजबांधवांना तो वाममार्गापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्याचा काहीही उपयोग होत नाही. कबीर हा सदबा आणि गंगव्वा यांचा मुलगा आहे. महाविद्यालयात चालत जाणारा, गावातील पितांबर जगदाळे भेटला तर त्याच्या सायकल वरून डबलसिट जाणारा, फावल्या वेळेत शेळी घेऊन गावाभोवती चारत हिंडणारा, सुट्टीत शेतात काम करणार, स्कॉलरशिपच्या पैशातून घरप्रपंचासाठी ज्वारी आणणारा, कॉलेजमधील आणि

गावातील प्रत्येक गोष्टीकडे तटस्थपणे पाहणारा असा कबीर आहे. कबीर हा विद्रोही असला तरी सारासार विचार करणारा आहे. कबीर हा परिस्थितीचे आणि जातीयतेचे भयानक चटके बसलेला तरुण आहे.

**बाळासाहेब शेडबाळे**

'तणकट' या कादंबरीतील 'बाळासाहेब शेडबाळे' ही देखील महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. बाळासाहेबाची व्यक्तिरेखा ही या कादंबरीतील खलप्रवृत्तीची व्यक्तिरेखा आहे. बाळासाहेब हा उपद्रवी आणि तितकाच बेरकी माणूस आहे. हा सुशिक्षित असून बँकेत नोकरी करणारा आहे. गावातील कुळवाड्याच्या लेकावळयापैकी उचापतखोर सधन माणूस आहे. गावात शिकलेल्या सगळया पोरांमध्ये तल्लख आणि चलाख असल्यामुळे त्याकाळी म्हणजे दहा-पंधरा वर्षापुर्वी सर्वात आधी त्याने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत नोकरी मिळविलेली असते. त्यावेळी त्याच्या हुशारीवर खूश झालेल्या आक्काबा राणेनंच जिल्हा बँकेचे तत्कालीन चेअरमन आबासाहेब थोरात यांच्याकडे त्याच्यासाठी शब्द टाकून नोकरी लावल्यामुळे त्याच्याकडे संपुर्ण आदराने पाहत असतो. बँकेतील आर्थिक व्यवहार हाताळण्याचा सराव असल्यामुळे त्याच्याकडे संपूर्ण गाव आदराने पाहत असतो. तसेच त्या कारणास्तव तो अफरातफर देखील करीत असतो. मुळात जातीनिहाय कमीपणा वाट्याला आलेला हा गृहस्थ दूध डेअरीतील आपला भ्रष्टाचार उघडकीला आल्यानंतर अपमानित होऊन महारवाड्याच्या आश्रयाला जातो. म्हारांचा कैवारी व दलित मित्र अशी प्रतिमा निर्माण करीत महारवाड्याला गावाविरुध्द सतत झुंजवत ठेवतो.

**आक्काबा राणे**

आक्काबा राणे हे पंचकुळी मराठा आणि गावचे इनामदार आहेत. आक्काबा हे क्षमाशिल वृत्तीचे सद्गृहस्थ आहेत. गावातील सवर्ण आणि हरिजनवाडा यांच्यामध्ये सुवर्णमध्य साधणारी ही व्यक्तिरेखा आहे. आक्काबा राणे हे दिलदार मनाचे आहेत. त्यांच्या दृष्टीने गावातील माणसांप्रमाणे म्हारवाड्यातील माणसे देखील आपलीच आहेत. परंपरा आणि नवता या दोन्ही गुणांचा सुंदर मिलाफ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एकवटलेला आहे. गावातील प्रत्येकाविषयी आत्मीयता बाळगणारा व सर्वांच्या उन्नतीसाठी मदत करणारा, माणसांच्या भलेपणावर निष्ठा असणारा, कायद्याने म्हारांना मिळालेल्या हककांची जाणीव असल्यामुळे गावाला म्हारांचा सूड घेण्यापासून परावृत्त करणारा, गावातील प्रत्येकाच्या हालचालीवर बारीक नजर ठेवणारा, जातीपलीकडे माणसांना हेरणारा, स्वतःच्या मनातून जातीभेद नष्ट झालेला असा हा माणूस आहे.

**गौण व्यक्तिरेखा**

'तणकट' या कादंबरीत कबीर, बाळासाहेब शेडबाळे, आक्काबा राणे यांच्याबरोबरच अनेक व्यक्तिरेखांची रेलचेल असलेली दिसून येते. प्रा. सिद्धार्थ नसलापुरे, प्रा. सत्यपाल धर्मरक्षी, प्रा. अवचित भालेराव, प्रा. फर्णींद्र कांबळे या दलित चळवळीत काम करणाऱ्या महाविद्यालयातील प्राध्यापकांचे वर्णनही अत्यंत बारकाईने लेखक राजन गवस यांनी केलेले आहे. तसेच आनंदा कांबळे, आल्ताफ कांबळे, जालिंदर कांबळे ही मंडळी दलित चळवळीचे कार्यकर्ते आहेत. राजा कांबळे, हिरामण भोसले, मोहन बल्लाळ, पितांबर जगदाळे, दयानंद रत्नाकर, जयाप्पा कांबळे, सुबाना कांबळे, प्रल्हाद कुलकर्णी, काशीनाथ ऐनापुरे हे सर्व कबीरचे मित्र आहेत.

**तणकट कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन :-**

'तणकट' ही कबीर कांबळे व त्याचा म्हारवाडा आणि त्याचा गाव यांची कथा आहे. परंतु ही कादंबरी केवळ दलित आणि ग्रामीण अशी मर्यादित चौकट न स्वीकारता गाव आणि म्हारवाडा यांच्यातील संघर्षाचे चित्रण करणारी आहे.

तणकट म्हणजे 'पिकातील तण' ते जर काढून टाकले नाही तर पिकाचा नाश होती. तशी समाजातील ही तणकटवृत्ती, विध्वंसक वृत्ती समाजाच्या स्वास्थ्याचा आणि विकासाचा नाश करते. या कादंबरीतून भान हरपत चाललेला दलित समाज आणि दलित पुढाऱ्यांचा संधीसाधूपणा व दुटप्पीपणावर लेखकाने ताशेरे ओढलेले आहेत. कबीर आणि मोहन बल्लाळ यांच्यामध्ये होणारी शेवटची चर्चा अत्यंत महत्त्वाची आहे. 'तणकट' च्या प्रारंभी राजन गवस यांनी नारायण कुलकर्णी-कवठेकर यांच्या कवितेतील,

"शेवटी तो निष्कर्षाप्रत येतो की,
या मातीतलं तणकट
जात नाही..
जाणार नाही.
आता तो फक्त गच्चं डोकं धरून बसतो,
मेंदूत तणकटाचं बी पडू नये,
म्हणून आटोकाट प्रयत्न करतो (अर्पणपत्रिका)

या ओळींच्या माध्यमातून कबीरची मन:स्थिती लेखकाने नेमकेपणाचे चित्रित केलेली आहे. यावरून या कादंबरीचे 'तणकट' हे शीर्षक यथायोग्य वाटते.

**भाषाशैली व संवादशैली**

राजन गवस यांच्या 'तणकट' या कादंबरीमधील भाषाशैली व संवादशैली अधिक सखोल आणि व्यापक दिसून येते. कबीर, मोहन बल्लाळ, काशिनाथ, हिरामठ इत्यादी मित्रांच्या संवादातून लेखकाने दलितांना आज पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. वर्तमानकालीन सवर्ण-दलित यांचा संघर्ष, जातीय तेढ, राजकारणातील मूल्यहिनता, दलित चळवळीची दिशाहीनता परिणामकारकपणे मांडण्यासाठी त्यांनी संवादशैलीचे उपाययोजन केलेले आहे. यादृष्टीने कबीर बाळासाहेब शेडबाळे तसेच कबीरचा मित्र मोहन बल्लाळ आणि कबीर यांच्यातील संवाद खूप बोलके आहेत,

'काय सुटल कॉलेज?' शेडबाळयानं त्याला विचारलं. त्याला एकदम आश्चर्य वाटलं. तो संशयी, तो म्हणाला,

'सुटलं की.'

'गावाकडे चाललास?'

'नाही, अजून काम आहेत.'

'चल की, चहा घेऊ.'

'नको. आत्ताच घेतलाय.'

थोडा थोडा म्हणत शेडबाळेनं कबीरच्या काखत हात घालत जवळ जवळ ओढलंच त्याला काय कळेना हा नेमका कसा वागतोय याचाही अंदाज बांधता येईना. अशाप्रकारचे मार्मिक विवेचन हे लेखकाच्या भाषाशैलीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

**वातावरण निर्मिती :-**

'तणकट' या कादंबरीमध्ये राजन गवस यांनी अत्यंत तटस्थपणे खेड्यातील दलित समाजाचे वर्तमान वास्तव मांडलेले आहे. या कादंबरीत कबीर कांबळे व त्याचा म्हारवाडा आणि गाव यांची ही कहाणी आहे. परंतु ही कादंबरी केवळ दलित आणि ग्रामीण अशी मर्यादित चौकट न स्वीकारता गाव आणि म्हारवाडा यांच्यातील संघर्षाचे चित्रण करणारी आहे. त्याची प्रभावी वातावरणनिर्मिती या कादंबरीमध्ये लेखकांनी केलेली आहे. दलितांच्या वस्तीचे बदलते स्वरूप, तथही अस्तित्त्वात असणाऱ्या सत्तेच्या व्यवस्था, ग्रामव्यवस्थेतील सरपंच, म्हार, मांग, मराठा, लोहार, परीट, न्हावी, कडूचे लेकावळे अशी जात आणि व्यवसायामध्ये विभागलेली समाजव्यवस्था तसेच या दोन केंद्रांच्या मध्यवर्ती असणारी कबीर कांबळे आणि बाळासाहेब शेडबाळे ही दोन माणसे, त्यांच्या भोवतीची तरणी पोरं, म्हातारी कोतारी माणसे या सर्वाचे मिळून एक जीवननाट्य लेखकाने 'तणकट' या कादंबरीमध्ये उभे केलेले आहे.

पितांबर आणि कबीर यांच्यातील संवादावरुन दलित विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या स्कॉलरशिपबाबत सवर्ण विद्यार्थ्यांना असलेला दुस्वास व वास्तव याची प्रभावी वातावरणनिर्मिती दिसून येते.

'शाब्बास! आयला, सरकारचं जावाई तुमी. तुमाम्नी स्कॉलरशीप शिकल्या शिकल्या नोकऱ्या आनी आमाम्नी काय तर धत्तुरा ! अता खरी चैन तुमचीच गा." पितांबरला पुन्हा टवाळकीची हुकी आली. मात्र त्यानं स्कॉलरशीप आणि नोकरीचा विषय काढल्यावर कबीर थोडासा दुखावला.

'आयला, आमची स्कॉलरशीप तुमच्या डोळयात कशी काय लसती रं? आमाला स्कॉलरशीप तीन म्हयन्याला मिळती, तेवढे पैसे तू आठवड्याला घालवतोस की, आमाला मात्र स्कॉलरशीप यायच्या आधी काय-काय त्यात बसवायचं होचा महिनाभर विचार करावा लागतो. तसं काय झंगट तुझ्या मागं हाय.' कबीरच्या आवाजात फरक पडला. जाणवण्या इतपत थरथर त्यामध्ये निर्माण झाली. पितांबरला हे जाणवलं, हे ही नेहमीचंच. ह्याला गमतीनं कधी छेडावं को तो एकदम चिडीला येतो. खेळीमेळीत असणारा कबीर एकदम दुखरा होत असावा? असा प्रश्न पितांबरलाही छळत होता. त्यामुळे पुन्हा तो हसत हसतच म्हणाला,

'कबऱ्या, चिडायचं न्हाई, खरं खरं सांगायचं, तुम्हाला स्कॉलरशीप मिळती. त्यादिवशी किती पोरं घरच्या जुंधळयाचा इच्यार करत्यात सांग बघू, आरंऽऽ उलट आमी बघत न्हाई एवढं पिक्चर तुझा तो उंडगा गोत्या बघतोय, मग ह्या पैसा कुठून येतो सांग बघू? आणि कॉलेजात म्हणशील तर एक एक नवीनच तुझा तो राजा कांबळया दिवसाला दहा रुपयाची सिग्रेट ओढतोय, असं त्याच्याच रुममधला तो काळे सांगत होता. आता मला सांग स्कॉलरशीप काय सिग्रेट फुकाय देत्यात? मग आम्ही बोललो की राग का येतो तुला?

'त्ये तुला नाही समजायचं. त्यासाठी म्हारोड्यात जन्म घ्यायला पाहिजे व्हतास. म्हणजे समजलं असतं. म्हणून कबीरनं विषय संपवला.' पितांबर बडबडतच राहिला.. पण कबीरच्या कानावर एकही शब्द पडत नव्हता. (पृ.६२, ६३) अशाप्रकारच्या संवादांमधून लेखकाने कादंबरीतील वातावरण अत्यंत प्रभावीपणे रेखाटलेले दिसून येते.

**शीर्षकाचे औचित्य :-** तणकट म्हणजे 'पिकातील तण' ते जर काढून टाकले नाही तर पिकाचा नाश होती. तशी समाजातील ही तणकटवृत्ती, विध्वंसक वृत्ती समाजाच्या स्वास्थ्याचा आणि विकासाचा नाश करते. या कादंबरीतून भान हरपत चाललेला दलित समाज आणि दलित पुढाऱ्यांचा संधीसाधूपणा व दुटप्पीपणावर लेखकाने ताशेरे ओढलेले आहेत. कबीर आणि मोहन बल्लाळ यांच्यामध्ये होणारी शेवटची चर्चा अत्यंत महत्त्वाची आहे. 'तणकट' च्या प्रारंभी राजन गवस यांनी नारायण कुलकर्णी-कवठेकर यांच्या कवितेतील,

"शेवटी तो निष्कर्षाप्रत येतो की,
या मातीतलं तणकट
जात नाही..
जाणार नाही.
आता तो फक्त गच्चं डोकं धून बसतो,
मेंदूत तणकटाचं बी पडू नये,
म्हणून आटोकाट प्रयत्न करतो." (अर्पणपत्रिका)

या ओळींच्या माध्यमातून कबीरची मःस्थिती लेखकाने नेमकेपणाचे चित्रित केलेली आहे. यावरून या कादंबरीचे 'तणकट' हे शीर्षक यथायोग्य वाटते.

**वेगळेपण**

राजन गवस यांची 'चौंडक' ही देवदासींच्या जीवनावरील कादंबरी, जोगत्यांच्या प्रश्नासंबंधी 'भंडारभोग', साहित्य पर्यावरणातील प्रदूषण व खेड्यात राहून लिहिणा-या तरुणाची घुसमट व्यक्त करणारी 'कळप' आणि दलित चळवळीतील अंतर्विरोध स्पष्ट करणारी 'तणकट' या त्यांच्या सर्वच कादंबऱ्या विषयाच्या वेगळेपणामुळे आणि नाविन्यतेमुळे गाजलेल्या आहेत. 'तणकट' च्या वेगळेपणासंदर्भात भारती निरगुडकर म्हणतात, "दलित साहित्यात ग्रामीण भागातील दलितांच्या समकालीन जीवनाचा सम्यक वेध घेण्याचा प्रयत्न अभावानेच झालेला दिसतो. या पार्श्वभूमीवर 'तणकट' मध्ये रूढ ग्रामीण व दलित समस्या एकेका प्रसंगाच्या रूपाने किंवा केवळ उल्लेखातून नोंदल्या जातात. कृषीसंस्कृतीच्या संदर्भात माणसामाणसांतील संबंध समंजसपणे टिकवले पाहिजेत व प्रश्नांची नवी मांडणी केली पाहिजे हे भान लेखकाने फार ताकदीने दिले आहे. समकालीन ग्रामीण जीवनावरील विधायक, मार्मिक भाष्य या दृष्टीन मराठी कादंबरीच्या क्षेत्रात 'तणकट' चे स्थान हे निश्चित वरचे आहे."[४] या मीमांसेवरुन या कादंबरीच्या वेगळेपणाची कल्पना येते.

**निष्कर्ष :-**

- राजन गवस यांच्या 'तणकट' या कादंबरीमध्ये गावगाड्यातील दलित सवर्ण यांच्यातील संघर्ष अभिव्यक्त करुन दलित व ग्रामीण जीवनातील वास्तवाचा आलेख रेखाटलेला आहे.
- 'तणकट' ही समकालीन ग्रामीण जीवनावरील विधायक व मार्मिक भाष्य करणारी आणि स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक-सांस्कृतिक विघटनाचा व मूल्य-ऱ्हासाचा विस्तारपूर्वक आलेख चितारणारी कादंबरी आहे.
- लेखकाने दलित समाजातील सुशिक्षित व आपली जात लपविणाऱ्या तसेच समाजाशी नातं तोडणाऱ्या दलितांचाही खरपूस समाचार घेतलेला आहे. सांस्कृतिक जीवनात एका महत्त्वाच्या प्रश्नावर भाष्य करणारी ही कादंबरी गाव आणि गावकुसाबाहेरील जीवन यातील ताण-तणाव, क्रिया-प्रतिक्रिया, साद-प्रतिसाद यांनी साकारलेली आहे.
- ग्रामीण जीवन आणि गावकुसाबाहेरील जीवन यांचा छेद घेत असतानाच दलित कार्यकर्ते, पुढारी व चळवळीतील संधीसाधू वृत्तींमुळे गावाची व दलित समाजाची झालेली शोकांतिका लेखकाने 'तणकट' मध्ये साकारलेली आहे.

- राजन गवस यांच्या 'तणकट' या कादंबरीमध्ये लेखकाने अत्यंत अलिप्त व तटस्थपणे खेड्यातील गावगाडा, मांगवाडा, म्हारवाडा यांच्यातील संघर्ष विविध व्यक्तिरेखांच्या माध्यमातून साकार केलेला आहे. दलित आणि सवर्णांमधील खेड्यातील वास्तववादी संघर्ष ते वाचकासमोर उभा करतात.
- राजन गवस यांनी अनेक व्यक्तीरेखांद्वारे संपूर्ण गावाचा व्यापक पट मांडलेला आहे. दलित सवर्ण संघर्ष, म्हारवाडा आणि मांगवाडा यांच्यातील संघर्ष, दलित चळवळ, दलित पुढारी आणि सहकारी संस्था यांचेही चित्रण केलेले आहे
- राजन गवस यांच्या 'तणकट' या कादंबरीमधील भाषाशैली व संवादशैली अधिक सखोल आणि व्यापक दिसून येते. कबीर, मोहन बल्लाळ, काशिनाथ, हिरामठ इत्यादी मित्रांच्या संवादातून लेखकाने दलितांना आज पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. कदम महेंद्र, 'कादंबरी सार आणि विस्तार' अक्षरदीप प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर, २००७ (पृ.११८).
२. डॉ. सानप किशोर, "मराठी कादंबरी नव्या दिशा", निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, २००५, (पृ.१६३).
३. राजाध्यक्ष विजया (संपा.), 'मराठी कादंबरी आस्वादयात्रा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २००८ (पृ.३२२, ३२३).
४. राजाध्यक्ष विजया (संपादक), 'मराठी कादंबरी आस्वादयात्रा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई- १६, पहिली आवृत्ती २००८ (पृ.३२२ ते ३२३)